**<u>फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे पुरावा</u>**

नि.फौ.ख.क्र. ६२/२००५
सरकार –वि– शेख नासीर
नि.क्र.१६

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–
माझे नाव — संजय नारायण कदम,
वय. ४९ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
राहणार – शिवाजी नगर, शेगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

१. दि.१९.०३.२००५ रोजी माझ्या समक्ष आरोपी शेख नासीर कडून काही जप्त करण्यात आले नव्हते. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र.२ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. त्याला सहीपुरता **<u>नि.क्र.१७</u>** देण्यात येते. पोलीसांनी माझ्या समक्ष फिर्यादीकडून काहीही जप्त केले नव्हते. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र.२ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. त्याला सहीपुरता **<u>नि.क्र.१८</u>** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांच्या विनंती वरुन उलट तपासणी करण्याची परवानगी देण्यात येत आहे</u>. <u>उलट तपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत</u> :–**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१९.०३.२००५ रोजी पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपीकडून पिवळ्या धातूचे ५० मणी असलेले एक काळ्या रंगाची पोथ, रोख रक्कम १३५/– रुपये व एक सुकलेला निंबु जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर पोलीसांनी जप्ती पंचनामा तयार करुन त्यावर माझी व आरोपीची सही घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, जपती पंचनामा शेगाव पोलीस स्टेशनमध्ये झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष जप्ती पंचनामा तयार करुन तो मला वाचून दाखविला व मी त्यावर वाचून समजून सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.१९.०३.२००५ रोजी पोलीसांनी फिर्यादीकडून घोड्याच्या चित्राचे नक्षी काम कलेले एक पांढऱ्या धातूचा तुकडा, माणसाच्या दोन पायाचे नक्षीकाम केलेले एक धातुचा तुकडा व डोळ्याच्या आकाराचे दोन पांढऱ्या धातुचे पत्रे जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी वरील वस्तु जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला व त्यावर माझी व फिर्यादीची सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती

पंचनामा शेगाव पोलीस स्टेशन येथे झाला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष जप्ती पंचनामा तयार करुन तो मला वाचून दाखविला व मी त्यावर वाचून समजून सही केली होती. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला शिक्षेपासून वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

<u>**सरतपास संपला.**</u>

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.०८.०४.२०२६ | दि.०८.०४.२०२६ |